# राणा प्रताप





IRBK-0115870
IRBK-0115870

इ. स. १५५६ च्या प्रारंभाला अकबर बादशहा गादीवर आला त्या वेळी मोगल हे भारताशी एकरूप झाले होते. विजेता म्हणून उत्तर हिंदुस्थानात अकबराची सगळीकडे फत्ते झालीच. त्याने गुजरात, बंगाल, ओरिसा, काश्मीर आणि सिंध हे आपल्या साम्राज्याला जोडले. मध्य भारतात आणि दक्षिणेतसुद्धा त्याला विजय मिळाले. आपल्या साम्राज्याला बळकटी यावी म्हणून त्याने आपल्या हिंदू प्रजाजनांना बऱ्याच संधी दिल्या. एका खानदान घराण्यातल्या रजपूत मुलीशी त्याने लग्नही केले. अनेक सर्वोच्च हुद्द्यांवर त्याने रजपूत राजांच्या नेमणुका केल्या. अशा रीतीने त्याने हिंदूंची मने जिंकण्याचा प्रयत्न केला. रजपूत त्याच्या भोवती गोळा झाले. पण किती झाले तरी अकबर हा एका परकी आक्रमकाचा नातू होता आणि आज्याप्रमाणे त्यानेही दुसऱ्याची राज्ये जिंकली होती.

अशा प्रकारे उत्तर हिंदुस्थानातले जवळ जवळ सारेच राजे-रजवाडे अकबराचे मांडलिक बनले असता, एकच एकांडी मानी व्यक्ती अशी होती, की जिने अकबरापुढे मान वाकवली नाही. ही व्यक्ती म्हणजे राणा प्रताप. तो जर अकबरापुढे वाकला असता तर अकबराच्या दरबारात बहुमानाला चढून विलासात राहू शकला असता. पण या शूर रजपूताला मान वाटत होता स्वातंत्र्यात! जीवनापेक्षाही स्वातंत्र्य त्याला प्रिय होते. अकबराच्या अफाट सैन्याशी मूठभर शिपाई घेऊन तो लढला. रानावनात कष्टाचे जीवन त्याने काढले. पण त्या हालअपेष्टांचे त्याला काही वाटले नाही. उलट त्यामुळे त्याच्या लढ्याला धार चढली.

भारताच्या इतिहासात क्रांतीची ज्योत जेव्हा जेव्हा पेटली तेव्हा प्रतापच्या नावाने तिला तेल दिले आहे. राणा प्रतापच्या शौर्यशाली लढ्याची ही चित्ररूप कथा वाचून तुम्हालाही नवे स्फुरण चढेल!

Printed by H.K. Nasta at IBH Printers, Mathuradas Vissanji Road, Andheri East, Bombay. Published by H.G. Mirchandani, Trustee, India Book House Education Trust, 249, D.N. Road, Bombay 1.


Editor Anant Pai   Retold by: Yagya Sharma   Artwork: Pratap Mulick

Translator: B.R. Bhagwat

प्र.क्र. ९५८७० ग्रं.वा. २०१३०५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
" केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे




IRBK-0115870

पश्चिम भारतातले राजस्थान म्हणजे रजपूत वीरांची भूमी.


आपल्या देशाची प्रतिष्ठा राखण्यासाठी रजपूत वीर सतत लढले. त्या झुंजार लढवय्यांनी इतिहासाचे पानन् पान भरलेले आहे.
लढवय्यांच्या त्या मालिकेत ठळकपणे चमकले चितोडचे रणमर्द. त्यांनी दाखवलेल्या शौर्याला व त्यागाला इतिहासात तोड नाही.
इसवी सनाच्या आठव्या शतकात याच चितोडकरांनी परदेशी आक्रमकांना धूळ चारली.



राणाजी, कालीमाला आपणांस प्रसन्न होवो! आपण केलेली प्रतिज्ञा फार भयंकर आहे.
गुरुदेव, मातृभूमीचं संरक्षण ही गंभीर बाब आहे...
...आणि अशा उदात्त कार्यासाठी बलिदान केलं तर त्यात विशेष ते काय?
रक्ताचा शेवटचा बिंदू असेपर्यंत आम्ही स्वातंत्र्यासाठी लढू.
ठीक बोललात! पण हे लक्षात ठेवा... हे काम सोपं नाही. कितीतरी लोक शत्रूला मदत करताहेत.
आपण आपली शक्ती वाढवली पाहिजे— चला, पहिल्याने एखादा किल्ला सर करू या.


चित्तोडजवळच मोगलांनी जिंकलेला एक किल्ला होता. त्यावर राणा प्रतापच्या मूठभर सैनिकांनी हल्ला चढवला.
हर हर महादेव!


जय चंडी!


अखेरीस मोगलांचा पराभव झाला.
शाबास शिपायांनो! किल्ला आपला झाला!


या विजयामुळे चितोडचे अनेक रजपूत किल्ल्यावर येऊन प्रतापला मिळाले.
चितोडच्या लोकांना सांगा की, तुमच्यावर जरी आक्रमकांची सत्ता असली...
...तरी तुमचा खरा राजा मी आहे! माझी आज्ञा आहे की स्वातंत्र्य मिळवीपर्यंत कुणी नांगर हाती धरू नका


इकडे अकबर बादशहाच्या दरबारात -
नवा विनोद ऐकलात का? प्रताप म्हणे अजून स्वतःला राजा म्हणवतो!
अर्थात्. पण राज्य नसलेला राजा!
खामोष! प्रतापने किल्ला जिंकलाय हे तुम्ही विसरता.
पण सरकार, आपलं प्रचंड सैन्य त्याला केव्हाच चिरडू शकेल.
चुकीची कल्पना आहे ही. प्रतापला चिरडणं सोपं नाही!


त्याच वेळी चितोडगडावर -
राणाजी, हा माणूस जमीन नांगरीत होता.
का रे? माझी अवज्ञा का केलीस?
पण मी मोगल सुभेदाराची परवानगी घेतली होती.
चितोडचा राजा मी आहे. मी तुला परवानगी दिली नव्हती.
.. तुझं पीक शेवटी शत्रूच्या घरात जाईल. फायदा होईल त्याचा!
मातृभूमीच्या हिताविरुद्ध तू वागलास. तुला मरणाची शिक्षाच योग्य!
दुसऱ्या दिवशी शेलक्याला फाशी देण्यात आले



ही बातमी अकबराच्या कानावर गेली.
भयंकर!... कदाचित् अजूनही मी त्याला वळवू शकेन.




अकबराने आपला रजपूत सेनापती मानसिंग याचा सल्ला विचारला.
प्रतापसारखा शूर पुरुष आपला मित्र झाला पाहिजे. राजा मानसिंग, तुम्ही जाऊन त्याला सांगा— म्हणावं, ही बंडाळी बंद कर!
आपलं म्हणणं रास्त आहे, हुजूर. प्रतापची दोस्ती मोगल साम्राज्याला हिताची ठरेल.



मानसिंग प्रतापला भेटायला गेला. प्रतापच्या मंत्र्याने त्याचे स्वागत केले
यावत, राजे मानसिंग!
मी एक संदेश आणला आहे. भारतसम्राट अकबर राणाजींशी मैत्री करू इच्छितात.
अकबर तुमचा सम्राट असेल. आम्हाला तो आक्रमक वाटतो— शत्रू!
राजाविरुद्ध उठाव करणं म्हणजे राजद्रोह!
स्वातंत्र्यासाठी लढणं हा राजद्रोह नाही. आमचं ते पवित्र कर्तव्य आहे.
पण तुम्ही हा विचार कसा करीत नाही - बादशहाच्या अफाट सैन्याचा पराभव करणं आपल्याला शक्य नाही.
हार जीत हा सवाल नाही. आमचं कर्तव्य आम्ही करणार.



तेवढ्यात राणा प्रताप व त्याचा मुलगा अमरसिंह तिथे आले.
पुरे मंत्रीजी! आपण या विषयावर नंतर बोलू. राजा मानसिंगांना भूक लागली असेल– अमर, आपलं साधंसुधं जेवण पाहुण्यांना देऊ या का?
जरूर, पिताजी.
माझ्याबरोबर आपणही....
नाही, राजे. आपण आमचे पाहुणे आहा. आमच्या आधी आपलं जेवण!
पण पाहुण्यांबरोबर यजमानांनीही जेवायचं असलं.
माफ करा, राजे! मी आपल्या पंगतीला बसणार नाही.
का बरं?



कारण... मानसिंग,
तुम्ही आपला मान
शत्रूला विकला आहे!





मी मित्र म्हणून आलो. माझा
तुम्ही अपमान करला?
याचा जाब तुम्हाला
द्यावा लागेल!
ठीक आहे.
मग आपण
रणांगणावरच
भेटू.




क्रुध्द झालेला मानसिंग प्रतापच्या किल्ल्यातून निघाला.
आणि अकबर भावोजींना
लढायला घेऊन या!
मानसिंगाची
बहीण अकबराला
दिलेली होती.


मानसिंग निघून गेल्यावर थोड्याच काळात राणा प्रतापने एका मोगल छावणीवर छापा घातला आणि अनेक सैनिकांना ठार केले.


अकबराच्या दरबारांत –
प्रतापने दुसरा मार्गच ठेवलेला नाही. आपण त्याला चिरडलंच पाहिजे!
ठीक आहे. करा तसं!


लवकरच मानसिंग आणि शाहजादा सलीम हे प्रचंड सैन्यानिशी निघाले.


आपण त्याला किल्ल्याबाहेर काढू शकलो तर आपलं काम सोपं होईल.
हो ना. आपली फौज एवढी अफाट आहे की आपण त्याचा सहज पाडाव करू!


शेवटी मोगल सैन्य एका चिंचोळ्या खिंडीपाशी येऊन पोचले. हा भाग हळदीघाट म्हणून प्रसिद्ध आहे.
खरं बिकट काम यापुढेच आहे.



दरम्यान, चितोडगडावर -
राणाजी, आपल्या हेरांनी अशी खबर आणली आहे की, शत्रूजवळ ८०००० सैन्य आहे, तोफा-बंदुका आहेत.
आणि आपल्याजवळ फक्त २२००० सैन्य आहे; तोफा-बंदुका नाहीत.


माझ्यापाशी तोफा असत्या आधिक सैन्य असते तर...


मानसिंगालाही महत्त्वाची खबर कळली होती.
राजे प्रतापजवळ फक्त २२,००० फौज आहे आणि बंदुका मुळीच नाहीत.
खुशखबर आहे ही!
हा प्रताप मूर्खच असला पाहिजे. जवळ माणसं नाहीत, शस्त्रं नाहीत, अन् बादशाही फौजेला सामना द्यायला निघालाय!
शूर आहे तो - मूर्ख नाही! सच्चा रजपूत आहे! ....
.... शाहजादे, तुम्ही ज्यादा घमेंडीत जाऊ नका! अफाट सैन्य नि चांगली शस्त्रं लढाईत उपयोगी पडतात खरी; पण खरं लढत असतं माणसाचं शौर्य-धैर्य!



ही बडबड बंद करून आपण आता हल्ला चढवू या ना?
ते शक्य नाही!
का?
कारण चितोडगडाकडे जाणारी वाट त्या चिंचोळ्या खिंडीतून जाते. आणि...
...प्रतापचे सैनिक तिथे दबा धरून बसले आहेत... त्यांनी हल्ला करीपर्यंत वाट पाहणं हेच शहाणपणाचं ठरेल.
बराच वेळ वाट पाहिल्यानंतर–
थांबायचं तरी किती? आताच्या आता चढाई करू या!
नको, शाहजादे!
हुजूर, प्रतापच्या किल्ल्याकडे जायची एक जवळची वाट मला सापडली!


ठीक. पुरेसे सैनिक बरोबर घेऊन पिछाडी-कडून हल्ला चढवा!
जशी आज्ञा!
लगेच मोगल सैन्याची एक बलाढ्य तुकडी गडाला वेढा घालायला निघाली.
राणा प्रतापला या नव्या हालचाली-चे वृत्त कळले तेव्हा त्याला काळजी वाटू लागली.
गडावरून लढणं हे उत्तम ठरलं असतं. पण आता शत्रूला हळदीघाटातच तोंड द्यावं लागणार!
अखेरीस हळदीघाटाच्या खोऱ्यात-
चढवा हल्ला!


प्रताप व त्याचे सैनिक हिरीरीने तुटून पडले.
प्रतापचा इमानी घोडा चेतकदेखील लढाईत भाग घेत होता.
मोगल सैन्याची जबर हानी झाली.
पण मोगलांची हार होत असतानाच त्यांना सैन्याची ताजी कुमक आली.


नंतर जी घनघोर लढाई झाली
तीत राणा प्रतापचे १५००० सैनिक कामी आले.



पण लढाई चालूच राहिली.
मानसिंग हुशार सेनानी आहे. आपण त्यालाच ठार केलं तर शत्रू सैन्याचा धीर खच्ची होईल.


मानसिंग हत्तीवर स्वार झालेला होता. प्रतापने त्याच्यावर चवताळलेल्या सिंहासारखी उडी टाकली.


प्रतापने मानसिंगावर भाला फेकला. पण तेवढ्यात हत्ती हलला आणि प्रतापचा नेम चुकून मानसिंगाचे प्राण वाचले!


दरम्यान प्रतापला शत्रू सैन्याने वेढले होते.
आपला नेता संकटात आहे हे पाहून प्रतापचा मित्र माना आणि काही सैनिक त्याच्या मदतीला धावले.
राणाजी घायाळ झाले आहेत. त्यांना वाचवलंच पाहिजे.
मित्राला वाचवण्यासाठी मानाने प्रतापचे शिरस्त्राण स्वतःच्या डोक्यावर घातले.


मोगल सैनिकांची फसगत झाली. मानालाच प्रताप समजून
त्यांनी त्याच्यावर हल्ला केला. माना शत्रूशी लढत असताना
प्रतापच्या इमानी घोड्याने धन्याला दुसरीकडे नेले.
बेशुध्द राणाच्या रक्षणासाठी काही
रजपूत सैनिकही चेतकबरोबर गेले.
प्रतापला जखमा झालेल्या होत्या.
त्याला त्यांनी रानातल्या एका गुहेत नेले.


कितीतरी काळ
राणा प्रताप जगला; पण त्याच्या कुटुंबाची स्थिती फार वाईट झाली. त्यांना रानातल्या कंदमुळांवर दिवस काढावे लागले.
एक दिवस प्रतापचा मुलगा अमरसिंह कोरडी भाकर खात होता.
पिताजी, मांजराने माझी भाकर नेली!
प्रतापच्या मुलीने स्वतःची भाकर भावाला दिली आणि ती भुकेने मूर्च्छित पडली.
मला आता हे सहन होत नाही. मी अकबराला लिहितो.
काही दिवसांनी अकबराच्या दरबारात -
अखेरीस प्रतापने माझ्यापुढे नमतं घ्यायचं ठरवलं! हा प्रसंग साजरा केलाच पाहिजे.




IRBK-0115870


राणा प्रतापने त्यांच्याबरोबर जाण्याचे नाकारले तेव्हा त्यांनी प्रतापच्या लोकांविरुद्ध शस्त्र उगारले.
आपण संख्येने फार कमी आहोत.
माझ्या शूर सैनिकांनो- लढा!
लवकरच सर्व रजपूत सैनिक ठार झाले आणि आता प्रताप कैदी होणार, तोच भिल्लांच्या एका टोळीने मोगलांवर हल्ला केला.


भिल्लांनी प्रतापची व त्याच्या कुटुंबातल्या मंडळींची सुटका केली आणि त्यांना आपल्या खेड्यात नेले. राणा प्रताप आपले लोक मारले गेले म्हणून दुःखित होता.
सारं संपलं! मातृभूमीच्या शृंखला मी तोडू शकलो नाही.
राणाजी, आपण धीर सोडू नका. आमची सारी भिस्त तुमच्यावर आहे.
पण सैन्यावाचून मी मोगलांशी कसा सामना करू?
मी रानातल्या माझ्या लोकांना गोळा करतो. आमची मदत घेऊन पुन्हा लढा!
पण सैन्याला पैसा लागतो. तो माझ्याजवळ नाही.
एक दिवस-
मी तुमच्यावर आणखी भार घालू इच्छीत नाही. मी इथून जातो.
आपण भार नाही, राणाजी!